**शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गासाठी सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- आस्था-२०२५/४९१/प्र.क्र.८९/वने-१२**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०५ मे, २०२६.

**वाचा:-**

१) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-वशिअ १२१८/प्र.क्र.५३/११, दि.०५/०६/२०१८.

३) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक-वशिअ २०२५/प्र.क्र.१७/विचौ-१, दि.०७/०४/२०२५.

४) शासन निर्णय क्र.आस्था-२०२५/४९१/प्र.क्र.८९/वने-१२, दि.२६ ऑगस्ट, २०२५

**प्रस्तावना**:

शासकीय कर्तव्ये पार पाडीत असताना शासकीय कर्मचाऱ्याकडून घडलेल्या अपराध, गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाच्या अनुषंगाने जेव्हा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिले जाते. तेव्हा अशी शिस्तभंगविषयक कार्यवाही करताना ती सक्षम प्राधिकाऱ्याने निदेशित करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय आदेशीत केलेली विभागीय चौकशी तसेच देण्यात आलेली शिक्षा विधी अग्राह्य ठरते व त्यामुळे अपराधसिध्दी होवूनही संबंधित अपचाऱ्यास दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी होत नाही. तसेच सेवाविषयक प्रकरणांबाबत मा.मुख्यमंत्री व सामान्य प्रशासन विभागास सादर करावयाची प्रकरणे, नियुक्ती प्राधिकारी, किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत शासन परिपत्रक साप्रवि दि.०५/०६/२०१८ व दि.०७/०४/२०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. शिस्तभंगविषयक कारवाईचे प्रकरण हाताळतांना या सर्व सूचनांचा विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा, शिस्तभंगविषयक कारवाई करावयाच्या प्रकरणामध्ये त्रुटी राहून केलेली कार्यवाही निष्फळ ठरु शकते.

२. सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दि.०७/०४/२०२५ च्या परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाना त्या त्या विभागाच्या अधिनस्त कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रकरणी संवर्गनिहाय शिस्तभंगविषयक प्राधिकारी घोषित करण्याबाबत निर्गमित केलेल्या सुचनेनूसार संदर्भिय क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गाचे शिस्तभंग विषयक प्राधिकारी घोषित करण्यात आले असून गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गाचे शिस्तभंग विषयक प्राधिकारी घोषित करण्याची कार्यवाही शासन मान्यतेने करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांना निर्देश दिले होते. त्यानुषंगाने गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गाचे शिस्तभंग विषयक प्राधिकारी घोषित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

## <u>शासन निर्णयः-</u>

वन विभागाच्या अधिपत्याखालील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी हेच शिस्तभंगविषयक प्राधिकारी असल्याने त्याप्रमाणे शिस्तभंगविषयक प्राधिकारी घोषित करण्यात येत आहे. त्यानुषंगाने गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गाचे शिस्तभंगविषयक प्राधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद केल्यानूसार तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांचे बाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) हे शिस्तभंग विषयक प्राधिकारी असल्याचे घोषित करण्यात येत आहेत.

त्यानुसार महसूल व वन विभाग, (वनप्रभाग) मंत्रालय, मुंबई यांच्या क्षेत्रिय कार्यालयातील विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे शिस्तभंगविषयक प्रकरणी यापुढे उचित कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५०५१५२५०४८७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA DATTATRAY SONJE

Digitally signed by MANJUSHA DATTATRAY SONJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=8E491E40DA312B87356D474F3637BDB55DFF1AA207B1723030265AD04926CADB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=14ABD3DD33A977D709D803B6057EB9FE0DE69BD4ACD4BF7CA36CED00F53EA72C, cn=MANJUSHA DATTATRAY SONJE
Date: 2026.05.05 15:26:29 +05'30'

**(मंजुषा सोनजे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत**:- १) अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)

५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)

६) मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले)

७) वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले)

८) महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल.

९) संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर.

१०) क्षेत्र संचालक (व्याघ्र प्रकल्प) व्यवस्थापकीय संचालक (एफडीसीएम) /महाव्यवस्थापक (एफडीसीएम )/ प्रादेशिक व्यवस्थापक (एफडीसीएम)

११) सह/उप सचिव (कार्यासन विचौ-१), साप्रवि, मंत्रालय, मुंबई.

१२) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी , महसूल व वन विभाग.

१३) निवडनस्ती (कार्यासन वने-१२)

## शिस्तभंग विषयक प्राधिकारी (विवरणपत्र)

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>पदनाम गट-ब (अराजपत्रित) व गट (क/ड) वेतनश्रेणी</th><th>नियुक्ती प्राधिकारी (पदनाम, गट)</th><th>किरकोळ शिक्षा करण्यास सक्षम प्राधिकारी (पदनाम, गट)</th><th>जबर शिक्षा करण्यास सक्षम प्राधिकारी (पदनाम, गट)</th><th>अपिलीय प्राधिकारी</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td></tr>
<tr><td colspan="6">गट-ब (अराजपत्रित)</td></tr>
<tr><td>१</td><td>लघूलेखक (उच्चश्रेणी)<br>(गट -ब) (अराजपत्रित)<br>एस-१६ (४४९००-१४२४००)</td><td>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) (गट -अ)</td><td rowspan="4">१) नियुक्ती प्राधिकारी<br>२) विभाग प्रमुख [प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर/ प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन -दुय्यम संवर्ग) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) /वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल / संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर]<br>३) प्रादेशिक विभाग प्रमुख [उपवनसंरक्षक (सर्व) / उप संचालक (व्याघ्र राखीव) / विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यालय असलेले) स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी / संचालक, वन प्रशिक्षण संस्था (सर्व).]</td><td>नियुक्ती प्राधिकारी</td><td rowspan="4">प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-याकडे अपील करू शकेल.</td></tr>
<tr><td>२</td><td>लघूलेखक (निम्नश्रेणी)<br>(गट -ब) (अराजपत्रित)<br>एस-१५ (४१८००-१३२३००)</td><td>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) (गट -अ)</td><td>नियुक्ती प्राधिकारी</td></tr>
<tr><td>३</td><td>क्षेत्र भूमापक / वनक्षेत्र सर्वेक्षक<br>(गट -ब) (अराजपत्रित)<br>एस-१४ (३८६००-१२२८००)</td><td>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) (गट -अ)</td><td>नियुक्ती प्राधिकारी</td></tr>
<tr><td>४</td><td>कनिष्ठ अभियंता<br>(गट -क)<br>एस-१४ (४१८००-१३२३००)</td><td>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) (गट -अ)</td><td>नियुक्ती प्राधिकारी</td></tr>
<tr><td colspan="6">गट-क</td></tr>
<tr><td>१</td><td>वरिष्ठ सांख्यीकी सहाय्यक<br>(गट -क)<br>एस-१४ (३८६००-१२२८००)</td><td>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) (गट-अ)</td><td>१) नियुक्ती प्राधिकारी.<br>२) विभाग प्रमुख [प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर/ प्रधान मुख्य वनसंरक्षक</td><td>नियुक्ती प्राधिकारी</td><td>प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-</td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | कनिष्ठ सांख्यीकी सहाय्यक<br>(गट -क)<br>एस-८ (२५५००-८११००) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक<br>(प्रशासन-दुय्यम संवर्ग)<br>(गट -अ) | (सर्व) /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) /वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल / संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर]<br><br>३) प्रादेशिक विभाग प्रमुख [उपवनसंरक्षक (सर्व) / उप संचालक (व्याघ्र राखीव) / विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यालय असलेले) स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी / संचालक, वन प्रशिक्षण संस्था (सर्व).] | नियुक्ती प्राधिकारी | याकडे अपील करू शकेल. |
| ३ | मुख्य लेखापाल<br>(गट -क)<br>एस-१३ (३५४००-११२४००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक)<br>(गट -अ) | | नियुक्ती प्राधिकारी | प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-याकडे अपील करू शकेल. |
| ४ | उप लेखापाल (प्रतिनियुक्ती)<br>(गट -क)<br>एस-१३ (३५४००-११२४००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| ५ | उप मुख्य लेखापाल<br>(प्रतिनियुक्ती)<br>(गट -क)<br>एस-१३ (३५४००-११२४००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| ६ | शारीरिक प्रशिक्षण ड्रिल शिक्षक<br>(गट -क)<br>एस-१३ (३५४००-११२४००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक)<br>(गट -अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| ७ | निमतनदार<br>(प्रतिनियुक्तीचे पद)<br>(गट -क)<br>एस-१३ (३५४००-११२४००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| ८ | लेखापाल<br>(गट -क)<br>एस-१० (२९२००-९२३००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक)<br>(गट -अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| ९ | वाणिज्य लेखापाल<br>(प्रतिनियुक्ती)<br>(गट -क)<br>एस-१४ (३८६००-१२२८००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १० | पोलीस बिनतारी संदेश दुय्यम निरीक्षक<br>(प्रतिनियुक्ती)<br>(गट -क)<br>एस-१४ (३८६००-१२२८००) | संबंधित मुळ विभाग | १) **नियुक्ती प्राधिकारी.**<br>२) विभाग प्रमुख [प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर/ प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) /वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय | नियुक्ती प्राधिकारी | प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-याकडे अपील करू शकेल. |
| ११ | गृह प्रमुख<br>(गट -क)<br>एस-१० (२९२००-९२३००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / वनसंरक्षक (प्रादेशिक)<br>(गट -अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १२ | अव्वल कारकून<br>(प्रतिनियुक्तीचे पद)<br>(गट -क)<br>एस-१० (२९२००-९२३००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | वनपाल<br>(गट -क)<br>एस-९ (२६४००-८३६००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक)<br>(गट -अ) | असलेले) / महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल / संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर]<br><br>३) प्रादेशिक विभाग प्रमुख [उपवनसंरक्षक (सर्व) / उप संचालक (व्याघ्र राखीव) / विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यालय असलेले) स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी / संचालक, वन प्रशिक्षण संस्था (सर्व).] | नियुक्ती प्राधिकारी | |
| १४ | सर्वेक्षक<br>(गट -क)<br>एस-८ (२५५००-८११००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक)<br>(गट -अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १५ | मंडल निरीक्षक<br>(प्रतिनियुक्तीचे पद)<br>(गट -क)<br>एस-८ (२५५००-८११००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १६ | बिनतारी संदेश चालक<br>(गट -क)<br>एस-८ (२५५००-८११००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १७ | बिनतारी तंत्रज्ञ<br>(गट -क)<br>एस-८ (२५५००-८११००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १८ | प्रमुख पोलीस शिपाई<br>(प्रतिनियुक्ती पद)<br>(गट -क)<br>एस-८ (२५५००-८११००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| १९ | कवायत शिक्षक<br>(गट -क)<br>एस-७ (२१७००-६९१००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २० | वनरक्षक<br>(गट -क)<br>एस-७ (२१७००-६९१००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | १) नियुक्ती प्राधिकारी.<br>२) विभाग प्रमुख [प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर/ प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग) / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / मुख्य वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) /वनसंरक्षक (स्वतंत्र कार्यालय असलेले) / महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल / | नियुक्ती प्राधिकारी | प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-याकडे अपील करू शकेल. |
| २१ | लॉंच चालक<br>(गट -क)<br>एस-७ (२१७००-६९१००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २२ | ट्रक चालक<br>(गट -क)<br>एस-६ (१९९००-६३२००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २३ | हत्यारी पोलीस<br>(प्रतिनियुक्ती)<br>(गट -क) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एस-६ (१९९००-६३२००) | | संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर.] | | |
| २४ | माहूत (गट -क)<br>एस-६ (१९९००-६३२००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट -अ) | ३) प्रादेशिक विभाग प्रमुख [उपवनसंरक्षक (सर्व) / उप संचालक (व्याघ्र राखीव) / विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यालय असलेले) स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी / संचालक, वन प्रशिक्षण संस्था (सर्व).] | नियुक्ती प्राधिकारी | |
| २५ | लिपीक (गट-क)<br>एस-६ (१९९००-६३२००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २६ | ग्रंथालय परिचर<br>(गट -क)<br>एस-६ (१९९००-६३२००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २७ | पोलीस (प्रतिनियुक्ती)<br>एस-६ (१९९००-६३२००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २८ | एसआरपी वाहनचालक (प्रतिनियुक्ती) (गट -क)<br>एस-६ (१९९००-६३२००) | संबंधित मुळ विभाग | | नियुक्ती प्राधिकारी | |
| २९ | पशु परिचर<br>(गट -क)<br>एस-३ (१६६००-५२४००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | | नियुक्ती प्राधिकारी | |
| | | | | | |
| | | | **गट-ड** | | |
| १ | नाईक (गट -ड)<br>एस-३ (१६६००-५२४००) | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक) (गट-अ) | **गट - अ**<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) /वनसंरक्षक (प्रादेशिक) | नियुक्ती प्राधिकारी | प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-याकडे अपील करू शकेल. |
| २ | नौका तांडेल (गट -ड)<br>एस-६ (१९९००-६३२००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावvि/वन्यजीव. | | |
| ३ | चारा कापणारा<br>(गट -ड)<br>एस-३ (१६६००-५२४००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावvि/वन्यजीव. | | |
| ४ | देखभाल सेवक<br>(गट -ड)<br>एस-३ (१६६००-५२४००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावvि/वन्यजीव. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | चेनमेन (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |
| ६ | खलासी (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |
| ७ | सहायक स्वयंपाकी (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | प्रकरणी शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटच्या वरिष्ठ अधिका-याकडे अपील करू शकेल. |
| ८ | शिपाई (गट-ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |
| ९ | मास्ट लश्कर (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |
| १० | तांडेल (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |
| ११ | पहारेकरी (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |
| १२ | अधिसंख्य वनमजूर (गट -ड)<br>एस-१ (१५०००-४७६००) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (गट-अ) | उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक)//सावि/वन्यजीव. | | |

----